# रिपोर्ट

## विरासत के बोल

मिथिला राऊत

“या कार्यक्रमाच्या नावात जसा विरासत (वारसा) हा शब्द होता त्या प्रमाणे वारशाची झलक कार्यक्रमाच्या सादरीकरनातून दिसून आली. एकीकडे सोहेल हाश्मी यांनी भारताचा इतिहास उत्कृष्ट रित्या उलगडून दाखवला तर दुसरीकडे नृत्याच्या सादरीकरनातून प्रादेशिक ओळख पक्की झाली. त्याचबरोबर सिन्हा भगिनींनी समाजात वावरत असतानाची मुलीची मन:स्थिती पडद्यावर मांडण्याचा जो प्रयत्न केला तो स्तुत्य होता.” असा अभिप्राय गोपा तिवारी यांनी **“विरासत के बोल”** या सांस्कृतिक कार्यक्रमा बद्दल दिला.

“विरासत के बोल” हा दोन दिवसीय सांकृतिक कार्यक्रम सेंटर  फॉर स्टडी ऑफ सोसायटी अँड सेक्युलारीझम, मुंबई; परीधी, भागलपूर; आमरा एक सचेतन प्रयास, कोलकता; प्रेरणा कला मंच, वाराणसी; आणि मुहीम, अलाहाबाद या शांती आणि सलोख्यासाठी काम करणाऱ्या संस्थांनी १९ आणि २० नोव्हेंबर २०२२ रोजी अनुक्रमे कला केंद्र, भागलपूर, ग्रामीण आणि मुक्ती निकेतन केंद्र, घोगा, शहरी भागात आयोजित केला होता. ५५० पेक्षाहि अधिक प्रेक्षकांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली होती. भागलपूर मधील कला केंद्र येथे सोहेल हाश्मींच्या हस्ते गौतम बुद्धांच्या मूर्तीला पुष्पहार घालून, मूर्तीला अभिवादन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाविषयी बोलताना मृदुला सिंह म्हणाल्या कि “वेदिजींनी गायलेली हृदयस्पर्शी गाणी आणि प्रेरणा कला मंच च्या कलाकारांनी सादर केलेल्या नाटकामध्ये दाखवलेलं मालक आणि सेवक यांच्या मधील धर्माच्या पलीकडे जाऊन असणारे निस्वार्थी नातं, एकमेकांसाठी केलेला त्याग, एकमेकांच्या धर्मा विषयी असणारा आदर हे समाजासाठी संदेश आहे.”

१९ नोव्हेंबरला हा कार्यक्रम पाच तास चालला. बिहारच्या  बोचऱ्या थंडीतही लोक खुर्च्यांना चिटकून बसले होते. भाषण, गायन, नृत्य, नाटक आणि कथा यांमध्ये प्रेक्षक अगदी रंगून गेले होते. गाण्यात प्रेक्षक इतके तल्लीन झाले होते कि, वेदी सिन्हांसोबत स्वतः गायला लागले.

भारताच्या संस्कृतीमध्ये विदेशी संस्कृतीने केलेल्या योगदानाची वेगवेगळी उदाहरणे देत भारतातील विविधतेबद्दल बोलताना इतिहासकार आणि चित्रपट निर्माते सोहेल

हाश्मी यांनी भारताचा सांस्कृतिक इतिहास अगदी हळुवार रित्या उलगडून सांगितला.




1.इतिहासकार व फिल्मकार सोहेल हाशमी

भारताची संस्कृती विदेशी संस्कृतीने देखील नटलेली आहे हे पटवून देताना ते म्हणाले कार्ली, वांगी या भाज्या भारतीय आहेत त्यांचा जन्म हिंदुस्तानात झाला आहे पण सीताफळ, चिकू, पेरू आणि शिमला मिरची इत्यादी दक्षिण अमेरिकेतून आले आहेत. कोबी, फ्लोअर या भाज्या फ्रान्स मधून आल्या आहेत. एवढेच काय तर स्त्रिया जो पेटीकोट घालतात तो फ्रान्स मधून आलेला आहे.

परंतु थोडी खंत व्यक्त करत पुढे ते म्हणाले कि, भारताची अखंडता हि भारताच्या विविधते मध्ये आहे, परंतु काही लोक भारताला एकच संस्कृती लादू पाहत आहेत जे भारताच्या अखंडतेसाठी धोकादायक आहे. काही वर्षांपूर्वी भारताच्या विविधतेवर लागणाऱ्या जाहिरातीची आठवण करून देत ते म्हणाले पूर्वी जाहिराती मध्ये पाच वेगवेगळ्या धर्माचे लोक दाखवले जायचे पण १५ वेगवेगळ्या साड्या नेसलेल्या स्त्रिया दाखवल्या जात नव्हत्या अशाप्रकारे भारताची विविधता हि धर्मापुरातीच सीमित करून ठेवल्याचे दिसत असल्याचे ते म्हणाले.

दिल्ली हून आलेल्या वेदी सिंन्हा यांनी “अरे चल मुसाफिर होले होले, बढ मुसाफिर होले...” हे त्याचं स्वरचित गाणं प्रस्तुत करून समाजात चालणाऱ्या एका मुलीची काहणी सांगितली आहे. लहानपणी घरातून जसं नदीप्रमाणे निर्गुण प्रेम त्या मुलीला मिळालं तसच प्रेम समाजातून मिळेल अशी अशा करून ती समाजात वावरण्यासाठी बाहेर पडते तेंव्हा मात्र तिच्या वाट्याला द्वेष, शंका आणि दुख: येतं. स्त्री म्हणून जगत असताना तिला समाजात काही ठिकाणी स्वीकारलं जातं तर काही ठिकाणी समाजातून डावललं जातं. पण तरीदेखील ती स्त्री धर्याने पुढे जात राहते त्या निर्गुण प्रेमाच्या शोधात...




2. गायिका वेदी सिन्हा, पाखी सिन्हा व वादक सुमंत बालकृष्णन

कारण तिचा विश्वास आहे कि, ती पण त्याच देवाची मुलगी आहे ज्याने पुरुषालाही बनवलं आहे. सर्वांचा निर्माता जर एकाच आहे तर मग कशी कोणती व्यक्ती **"ती "** ला अडवेल जी तिच्यासारखीच आहे!

"मेरा राम मैला कर दियो रे" या गाण्यातून सिन्हा भगिनींनी कबीरला दिसलेला राम प्रेक्षकांसमोर मांडला. निर्गुण राम हि कोणती व्यक्ती किंवा कोणती धारणा नाही तो राम म्हणजे प्रेम आहे जो ब्रम्हांडातल्या प्रत्येक अनु रेनुमध्ये आहे. जो प्रत्येक सृष्टीतल्या प्रत्येक कनाकनात भरला आहे. परंतु सध्या या निर्गुण निर्मळ रामाला द्वेष, ईर्ष्या, राग हिंसा यांनी दुषित करून ठेवलं आहे.




*3. मुक्ती कलाकेंद्र या विद्यालायाच्या विद्यार्थिनिंनी बिहारी लोकनृत्य सादर करताना*

गायक विनय भारती यांनी श्री रामनद शर्मा यांचे "दिन दिन भर घाम गरि, पताय ची क्यारी क्यारी तैयो नाही." हे गाणं **अंगिका** या बिहारच्या स्थानिक भाषेतून गायलं. या गाण्यातून, कितीही मेहनत केली तरी त्याचे योग्य फळ मिळत नसल्याची शेतकर्याची व्यथा मांडली आहे. तर ताल नृत्य संस्थान च्या नृत्यांगना तसेच मुक्ती कलाकेंद्राच्या विद्यार्थिनींनी बिहारी लोकनृत्यातून नवरा बायकोचं एकमेकांवरचं रुसणं आणि मग एकमेकांना मनवनं तसेच भावावर असणारं बहिणीचं प्रेम इत्यादी दाखवत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. या सदरीकारानांतून सध्या लुप्त होत चाललेल्या कलेचा लोकांना आनंद घेता आला.



*4. प्रेरणा कला मंच चे कलाकार "मंदिर - मस्जिद" नाटक सदर*

फादर आनंद मॅथ्यूव्ह यांनी निर्देशित केलेले, मूळ मुंशी प्रेमचंद लिखित "मंदिर – मस्जिद" हे नाटक, प्रेरणा कला मंच, वाराणसीच्या कलाकारांनी प्रस्तुत करून अनेक पर्षांपुर्वी लिहिलेलं नाटक जणू काही जीवंत केलं. नाटका मध्ये धर्माच्या नावाखाली लोक फूस लावतात, दंगली घडवतात, पण चौधरी अतरत अली आणि त्याचा नोकर भजन सिंग यांच्यामधील नातं धर्माच्या पलीकडेहि जाऊन विश्वास आणि प्रेमाचं नातं किती मोठं असतं हे दाखवलं.

तर “दुनिया का मेला” फादर आनंद मॅथ्यूव्ह यांनीच निर्देशित केलेले मुळचे मुंशी प्रेमचंद लिखित नाटक प्रेरणा कलामंच, वाराणसी च्या कलाकारांनी  सादर करत जात, पात, धर्म पंत, गरीब – श्रीमंता  पलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीला आदराची वागणूक दिली गेली पाहिजे, कुणाचे हि धर्माच्या, जातीच्या किंवा गरिबीच्या नावाखाली शोषण होऊ नये या विषयी संदेश दिला.




*5. कलाकार अंकुर चौधरी 'लव्ह स्टोरी' हि कथा सदर करताना*

कोलकताचे कलाकार अंकुर रॉय चौधरी यांनी “लव्ह स्टोरी” हि कथा आपल्या अभिनयातून प्रस्तुत करून दाखवली. त्या कथे मध्ये “हिरमणी – सिराज’, ‘लाल टमाटर – कमली टमाटर’ आणि ‘जमीन – किसान गफूर’ यांच्या तीन प्रेमकथा सादर करून भांडवलशाही मुळे होणारे जमिनीचे नुकसान, पर्यावरणाचा ऱ्हास, भांडवलदारांच्या पैशाच्या हव्यासापोटी जाणारा शेतकऱ्याचा जीव, आणि धर्माच्या नावाखाली होणारे ओनर किलिंग दाखवले. या तीनही कथा एकमेकांवर अवलंबून असल्यामुळे सर्व प्रेक्षक कथेच्या प्रत्येक शब्दाकडे अगदी कान लाऊन ऐकत होते. काही प्रेक्षक तर भाऊक झाले होते. शेवटी लाल टमाटर आणि कमली टमाटर ची कथा जिवंत राहण्यासाठी लोकांनी स्वखुशीने कथाकाराच्या टोपी मध्ये पैशांच्या रुपात दक्षिणा दिल्या.



*6. प्रेरणा कला मंच चे कलाकार नुक्कड नाटक सदर करताना*

२० नोवेंबर ला भागलपूर स्टेशन बाहेर प्रेरणा कला मंच च्या कलाकारांनी ‘भूक बनाम धर्म नामक  नुक्कड नाटक प्रस्तुत करून प्रेम, बंधुभाव, एकता, समानता आणि विविधता मजबूत करण्याचा संदेश दिला तर इतर भागलपूर परीधीचे विनय, राहुल, सुषमा, इत्यादी तसेच आखर, रांचीचे प्रवीर पिटर, प्रीयाशील आणि विनय यांनी मिळून ‘ गाव छोडब नाही, जंगल छोडब नाही’ हे गाणे गाऊन जन

आंदोलनाचा आवाज बुलंद केला. १५० पेक्षाही जास्त लोक स्टेशन परिसरात नाटक पाहण्यास गोळा झाले होते. काही प्रेक्षक तर गाण्याचा ताल धरून गात नाचू लागले.



7. चित्रकला आणि हस्तकला प्रदर्शन




8. सांस्कृतिक संवाद

त्याचबरोबर १९ आणि २० नोव्हेंबर ला केलेल्या चित्रकला आणि हस्तकला प्रदर्शनातून लोकांना लोकसंस्कृतीचे दर्शन झाले. तसेच १९ नोव्हेंबर ला सकाळी सांस्कृतिक संवाद नावाचा एक कर्यक्रम झाला. या कार्यक्रमास जवळ जवळ ५० व्यक्तींनी उपस्थिती दर्शविली होती. भारताचा इतिहास, भारतीय संस्कृती यावर चर्चा झाली. इतिहासकार सोहेल हाश्मी यांनी आपलं मत व्यक्त करताना म्हणाले कि, भारताला सम्राट अशोक किंवा इतर राजांचा जसा चांगला इतिहास लाभला आहे तसेच आपण वर्षानुवर्षे शुद्रांना दिलेली वाईट वागणून, महिलांवर केलेला अन्याय याची देखील जबाबदारी घेतली पाहिजे. तर इतर काही लोकांनी समाज सुधारायचा असेल तर रामायण, महाभारत आणि इतर धर्म ग्रंथांचा आधार घेत समाजात पुरोगामी बदल घडवून आणला पाहिजे असे मत मांडले.

या कार्यक्रमास इरफान इंजिनिअर, सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसायटी चे संचालक; अंशू मालीवाय, कवि; परिधीचे राहुल राजीव, उदय, स्थानिक पोलीस, पत्रकार, एम.पी अजय कुमार मंडल, एमएलसी एन. के. यादव हे देखील उपस्थित होते.

२० नोव्हेंबरच्या कार्याक्रमचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत प्रसाद यांनी केले, तर १९ नोहेंबर च्या कार्याक्रमचे संचालन उदय आणि अंशू मालवीय यांनी केले. कवि अंशू मालवीय यांनी आपल्या कविता आणि शायरी सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवण्यास अजिबात कमी पडू दिले नाही.